REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय-अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २५ सप्टेंबर, १९४० अंक ३९

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

### दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

## विविध माहिती

### रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती बोर्डाची सभा

रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती बोर्डाची सभा ५ ऑक्टोबर रोजीं मद्रास येथें भरणार आहे. मध्यवर्ती बोर्डाच्या वर्षांतून निदान सहा तरी सभा व्हाव्या लागतात.

### अमेरिकेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांस इषारा

"अमेरिकेंतील विश्वविद्यालयांत नांवें नोंदवून तेथें शिक्षणाकरितां जाण्याची व्यवस्था अनेक हिन्दी विद्यार्थी करीत आहेत, परंतु रुपये घेऊन डॉलर देण्यास रिझर्व्ह बँक तयार आहे किंवा नाहीं, ह्याची चौकशी केल्याविना ते अमेरिकेस गेले तर त्यांस पैशाची अडचण पडेल; हुंडणावळीची शक्य तेवढी बचत करण्याचें सरकारनें ठरविलें आहे; राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें आवश्यक असेल अशा कारणासाठींच केवळ रुपयाबद्दली डॉलर मिळूं शकतील." असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### युद्ध-फंड

हिंदी युद्ध फंडास १३ सप्टेंबर अखेर खालीलप्रमाणें रकमा मिळाल्या आहेतः—

| | रु. |
|---|---|
| बिनव्याजाचे डिफेन्स बॉंड्स : | १,९९,०१,००० |
| ३% डिफेन्स बॉंड्स (रोख) : | ९,५४,९१,००० |
| (जुने रोखे बदलून) : | १२,४८,१०,००० |
| पो. ऑ. सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें : | ८७,१५,००० |
| एकूण | २४,८९,१७,००० |

### शिलकी मालाच्या उठावाचा प्रश्न

युद्धपरिस्थितीमुळें हिंदुस्थानाचा निर्गत व्यापार मंदावला असून मालाचा साठा वाढत आहे. त्याची व्यवस्था काय करावी व त्या मालाची किंमत अतिशय खालीं जाऊं न देण्यासाठी काय उपाय योजावा, ह्याची चर्चा मद्रास विश्वविद्यालयाच्या अर्थशास्त्रज्ञांनीं एक सभा भरवून केली. हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि, सर रामस्वामी मुदलियार, ह्यांनीहि चर्चेत भाग घेतला.

### तांदुळाची खरेदी

जपाननें ब्रह्मदेशांत तांदुळाची खरेदी मोठ्या प्रमाणावर चालविली आहे.

### दारूबंदीमुळें नोकरी गेलेल्यांची सोय

मुंबईमध्यें दारूबंदी केल्यामुळें कित्येकांचा उद्योगधंदा बुडाला त्यांस पोटापाण्यास लावण्यास मदत करण्याकरितां मुंबई सरकारनें ऑगस्ट, १९३९ मध्यें एक अधिकारी नेमला होता, त्याची नेमणूक आतां रद्द करण्यांत आली आहे. एका वर्षाचे अवधींत ८०४ लोकांनीं ह्या अधिकाऱ्याकडे अर्ज केले, त्यांपैकीं ५७१ लोकांस नोकरी देण्यांत आली, ती २६४ लोकांनीं स्वीकारली. २०६ लोकांना नोकरी पसंत पडली नाहीं व १०१ लोकांनीं पत्रास उत्तर धाडलें नाहीं. १८२ लोकांस सरकारी नोकरी मिळूं शकली, त्यांपैकीं ६१ जागा कायमच्या आहेत.

### लोखंडाच्या खाणी

हिमालयांतील कांगरा हिल्समध्यें मंडी संस्थानचे सरहद्दीवर लोखंडाच्या खाणींचा शोध लागला आहे, त्यांतून शुद्ध लोखंड काढण्याचे शास्त्रीय प्रयत्न अद्याप झालेले नाहींत. कांगरा हिल्स लाहोरपासून १०० मैलांवर असून तेथें जाण्याचा रेल्वे रस्ता लाहोर—पठाणकोट—जोगींद्रनगर असा आहे.

### म्हैसूर सरकारनें सोन्यावरील पट्टी वाढवली

म्हैसूर संस्थानांतील सोन्याच्या व चांदीच्या खाणींतून हे धातु काढून विकणारास तेथील सरकारचा लायसेन्स लागतो व काढलेल्या सोन्या-चांदीचे विशिष्ट प्रमाणांत रॉयल्टीचे स्वरूपांत कर द्यावा लागतो. म्हैसूर सरकारनें रॉयल्टीचा दर वाढविला आहे परंतु ही वाढ आज तेथें काम करीत असलेल्या कंपन्यांस लागू नाहीं.

### हिंदुस्थानांत रेडिओचें उत्पादन

सर एच. पी. मोदी ह्यांच्या नेतृत्वाखालीं मुंबई येथें एक खासगी लिमिटेड कंपनी स्थापन करण्यांत आली आहे. ही कंपनी रेडिओ सेट्सचें उत्पादन करणार आहे. व्हाल्व मात्र परदेशांतून आणावे लागतील. हिंदुस्थानांतील सर्व रेडिओ स्टेशन्सचे कार्यक्रम ऐकतां येतील असे सेट्स प्रारंभीं तयार केले जातील व नंतर त्याहून मोठ्या सेट्सचें काम हातीं घेतलें जाईल.

### ४ लक्ष रुपये दिल्यास मुलगा परत

एका कोट्याधीशाचा तीन वर्षांचा मुलगा आपल्या दाईबरोबर फिरावयास गेला असतांना त्यास दोघांनीं पळवून नेलें, अशी हिल्सबरो (अमेरिका) येथून बातमी आली आहे. मुलास पळवणारांनीं ४ लक्ष रुपये मागितले आहेत, ते देण्यास मुलाचे आईबाप तयार आहेत.

### जमीनमहसुलाचें उत्पादन वाढलें

सिंध सरकारचें जमीनमहसुलाचें उत्पन्न १९३९-४० मध्यें ३० लक्ष रुपयांनीं वाढलें. कालव्याचें पाणी मिळण्याच्या सोईंत वाढ झाली, त्याचा हा परिणाम आहे.

### ब्रह्मदेशांतून चीनकडे जाण्याचा मार्ग

ब्रह्मदेश व दक्षिण चीन ह्यांस जोडणाऱ्या ७२६ मैल लांबीच्या रस्त्यावरून चीनमध्यें युद्धसामुग्रीची व पेट्रोलची आयात होण्यास ब्रिटिश सरकारनें जपानी सरकारच्या सूचनेप्रमाणें तीन महिने बंदी केली आहे. ही बंदी उठविण्यांत यावी, अशी विनंति करणारा अर्ज सुमारें २½ लक्ष लोकांनीं ब्रिटिश सरकारकडे केला आहे. हा रस्ता तयार करण्यास २½ लाखांपेक्षा अधिक मजुरांचे श्रम कारणीभूत झाले आहेत. १८ महिन्यांत तें काम पुरें झालें. देखरेख अमेरिकन व ब्रिटिश मिस्त्रींची होती. डिसेंबर १९३८च्या सुमारास जपाननें चीनचे सर्व नाविक मार्ग बंद केले, त्यावेळीं चीनचें परदेशाशीं दळणवळण टिकण्यास वरील रस्त्याचा अतिशय उपयोग झाला. ह्या रस्त्यास २८९ पूल व २,००० फरशी घातलेल्या मोऱ्या आहेत. रस्त्याची सरासरी रुंदी फक्त ९ फूट आहे.

### कस्टम्सचें उत्पन्न घटलें

गेल्या ऑगस्ट महिन्यांत हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें (मिठाचें उत्पन्न वगळून) २ कोटि, ८९ लक्ष रुपये झालें. जुलै महिन्यांतला हा आकडा ३ कोटि, १४ लक्ष होता आणि गेल्या वर्षांतील ऑगस्ट महिन्याचा ४ कोटि, १६ लक्ष रुपये होता. केरोसिन, साखर, काड्यांच्या पेट्या इत्यादींवरील एक्साइज पट्टीचें ऑगस्ट महिन्याचें उत्पन्न ५६ लक्ष रुपये झालें. जुलैमधला आकडा ५१ लक्ष होता आणि १९३९ च्या ऑगस्टचा आकडा ३७ लक्ष होता. कस्टम्स व एक्साइज मिळून एप्रिल ते ऑगस्ट ह्या पांच महिन्यांचे मुदतींत येथे सरकारास १९ कोटि, ७४ लक्ष रुपयांचें उत्पन्न झालें. १९३९ च्या ह्याच पांच महिन्यांतलें उत्पन्न २२ कोटि, ६२ लक्ष रुपये झालें होतें.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४५८ |
| २ युद्धसामुग्रीची हिंदुस्थानांतून मदत ... | ४५९ |
| ३ प्रॉव्हिन्शिअल को बँक | ४६० |
| ४ स्फुट विचार ... | ४६१ |
| युद्धखर्च, कर आणि कर्ज–बोजा कोणास पडला आहे? जर्मनीला का इंग्लंडला?– इंग्लंडवर जर्मनीचे रात्री हल्ले—'अघणी' | |
| ५ व्याजाचे दर चालू युद्धांत इतके कमी कां? ... | ४६३ |
| ६ जमीनदारांस गव्हर्नरांचा सल्ला ... ... | ४६३ |
| ७ मुंबई प्रांतांतील उद्योग-धंद्यांची स्थिति ... | ४६४ |
| ८ जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. ... | ४६४ |
| ९ सहकारी बँकांचे अहवाल ... | ४६५ |
| १० भातीची आवश्यकता नाहीं | ४६६ |
| ११ ॲल्युमिनियम ... | ४६६ |
| १२ निवडक बाजारभाव | ४६६ |

अर्थ

बुधवार, ता. २५ सप्टेंबर, १९४०

## युद्धसामुग्रीची हिंदुस्थानांतून मदत

### दिल्ली येथें साम्राज्य परिषद

युद्धास सुरुवात झाल्यापासून शत्रुराष्ट्रांनीं एकमेकांशीं असलेले व्यापारी संबंध तोडून टाकले आहेत, एवढेंच नव्हें तर तटस्थ राष्ट्रांकडून आपापल्या शत्रूंस युद्धसामुग्री पोहोंचूं नये म्हणून लष्करी नाकेबंदीची त्यांनीं परमावधी गांठली आहे. इंग्लंड व साम्राज्याचे इतर भाग ह्यांस आपली सामुग्री आतां शक्यतोंवर साम्राज्यांतून मिळविणेंच आवश्यक झालें आहे. विशेषतः फ्रान्सचा पराभव होऊन इटलीची आफ्रिकेमध्यें चढाई सुरू झाल्यानें सुएझच्या कालव्याच्या पूर्वेकडील भागाचा इंग्लंडशीं केव्हां संबंध तुटेल ह्याचा नेम राहिलेला नाहीं. एडन, दक्षिण आफ्रिका, हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया इत्यादि ब्रिटिश साम्राज्याच्या पूर्व भागांतील देशांस स्वसंरक्षणार्थ वाढत्या प्रमाणावर युद्धसाधनें उत्पन्न करणें आवश्यक झालें आहे. ह्या भागांतून इंग्लंडला सामुग्री पोहोंचूं शकली तर तीही सध्यांच्या आणीबाणीच्या प्रसंगीं बिनमोलच ठरेल. युद्धसामुग्रीच्या उत्पादनाचे दृष्टीनें साम्राज्याच्या पूर्व भागांतील देशांत हिंदुस्थानालाच अग्रपूजेचा मान मिळणें साहजिक आहे. एक तर आशिया, आफ्रिका व ऑस्ट्रेलिया ह्या तिन्ही खंडांच्या मानानें हिंदुस्थान अगदी मध्यवर्ती आहे. शिवाय, शेतकी, खाणी, कारखाने इत्यादिकांची येथें आधींच पुष्कळ वाढ झालेली आहे. येथील सर्व उपलब्ध साधनें ध्यानांत घेऊन साम्राज्याच्या इकडील व मध्यवर्ती संरक्षणाच्यां दृष्टीनें त्यांत तात्काल कोणती सुधारणा घडवून आणणें इष्ट आहे हें ठरविण्याचें साम्राज्य सरकारनें मनांत घेतलें आहे. ऑक्टोबर महिन्याच्या २५ तारखेस दिल्लीस एक छोटी आर्थिक परिषद् भरणार आहे. ह्या परिषदेस कॅनडा व आयर्लंड खेरीज बहुतेक सर्व वसाहतींचे प्रतिनिधी हजर राहणार आहेत. इंग्लिश सभासदांचें शिष्टमंडळ सर ॲलेक्झँडर रॉजर ह्यांच्या नेतृत्वाखाली येथें येऊन दाखलही झालें आहे.

इतर वसाहतींचे प्रतिनिधीही आतां क्रमाक्रमानें येऊं लागतील. ह्या परदेशच्या पाहुण्यांत कांहीं सरकारी अधिकारी, कांहीं तज्ज्ञ व कांहीं व्यापारी संस्थांचे प्रतिनिधी आहेत. हिंदुस्थानामार्फत होणाऱ्या निवडीमध्यें बिनसरकारी धंदेवाल्यांचा समावेश होणार आहे किंवा नाहीं ह्याचा अजून उलगडा झालेला नाहीं. येथील साधनांत अधिकांत अधिक वाढ होऊन त्यांचा युद्धकार्यास पराकोटीचा उपयोग व्हावयाचा असेल तर प्रत्यक्ष उत्पादक धंदेवाल्यांस युद्धविषयक गरजांची पूर्ण माहिती होणें आवश्यक आहे. ही साधी गोष्ट सरकारास पटून धंदेवाल्यांचा हिंदी शिष्टमंडळांत अंतर्भाव होईल अशी आशा आहे. परंतु औपचारिक रीत्या खाजगी धंदेवाले सभासद म्हणून नेमले नाहींत तरी इतर मार्गांनीं परदेशी प्रतिनिधी व हिंदी धंदेवाले ह्यांचा संबंध आल्याखेरीज राहणार नाहीं. असा संबंध उभयपक्षीं हितावह ठरेल ह्यांत शंका नाहीं. येथील निरनिराळ्या धंदेवाल्यांकडून विस्तृत माहिती सरकारनें आधींच मागितली आहे. व्यापारमंत्री, सर रामस्वामी मुदलियार, ह्यांनींही अनेक संस्थांच्या प्रतिनिधींस मुलाखती देऊन त्यांचा मनोदय जाणून घेतला आहे. परदेशचीं शिष्टमंडळें व त्यांबरोबर आलेले तज्ज्ञ हे युद्धविषयक काम करणाऱ्या सर्व महत्त्वाच्या कारखान्यांस भेट देणार आहेत. एवढ्या विस्तृत प्रमाणावर भरणाऱ्या आगामी परिषदेबद्दल हिंदी लोकांत आशायुक्त कुतूहल उत्पन्न होणें साहजिकच आहे.

हिंदी राष्ट्राच्या आर्थिक जीवनाचा आत्मा म्हणजे शेतकरी होय. त्यांच्या धंद्याला तर युद्धामुळें दुहेरी जळवा लागल्या आहेत. देशाचा निर्यात व्यापार सुमारें २० कोटींनीं घटल्यानें मालाचा उठाव कमी झाला व बाजारभाव उतरल्याने विक्रीची किंमतही कमी येऊं लागली. मध्यंतरीं हिंदुस्थान् सरकारचे आर्थिक सल्लागार डॉ. ग्रेगरी व डॉ. मीक हे अमेरिकेस जाऊन तेथें हिंदी मालाचा वाढत्या प्रमाणावर उठाव होणें कितपत शक्य आहे ह्याची चौकशी करून आले. ह्या चौकशीचा वृत्तांत अजून प्रसिद्ध झाला नाहीं. परंतु अमेरिकेस लागणारा बहुतेक कच्चा माल त्याच खंडांतील अर्जेंटाईन देशांतून अधिक सुलभपणें मिळण्यासारखा असल्यानें येथील धान्यास तिकडे म्हणण्यासारखा वाव नाहीं असेंच धरून चालणें पाहिजे. अमेरिकेची युद्धविषयक तयारी वाढत्या प्रमाणावर होत असल्यानें कदाचित् मँगॅनीज्, मायका, ताग इत्यादि वस्तूंस वाढती मागणी येणें शक्य आहे. साम्राज्यांतील देशांशीं होणाऱ्या वाटाघाटींच्या वेळीं अमेरिका व हिंदुस्थान ह्यांच्यामधील व्यापाराबद्दल अनुकूल धोरण ठेवणें जरूर आहे. ग्रेगरी व मीक ह्यांच्या भेटीनें ही गोष्ट सोपी झाली असेल तर त्यांचा प्रवास अगदीच निष्फळ ठरणार नाहीं.

दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया ह्या दोन्हीं राष्ट्रांस हिंदुस्थानाकडून पुष्कळच सहाय होण्यासारखें आहे. आतां हें खरें कीं, त्या राष्ट्रांच्या निर्यात व्यापारांत अशा थोड्याच जिनसा आहेत कीं, ज्यांचा हिंदुस्थानांत सहज खप होईल. उलट, अनेक तऱ्हेचा कच्चा माल व कापड, तंबाकू, लोखंड व पोलाद इत्यादि आवश्यक माल येथून मोठ्या प्रमाणावर वसाहतींस पुरवितां येईल. अशी मागणी वाढल्यास येथील उत्पादकांचा फायदा होऊन साम्राज्याची गरजही भागेल. अनेक तऱ्हेचें युद्धविषयक सामान हल्ली सरकारी कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर तयार होत असून त्याचाही इकडील भागाची आक्रमक व संरक्षकशक्ति वाढविण्यास उपयोग होईल.

परंतु आधुनिक धंद्यांस व युद्धांस सारखेच आवश्यक असणारें यंत्रसहाय येथें अगदीच प्रथमावस्थेंत आहे ही दुर्दैवाची गोष्ट

आहे. केवळ हिंदुस्थानाच्याच नव्हे तर एकंदर साम्राज्याच्या संरक्षणाकरितां तरी ही उणीव आधींच भरून निघणें जरूर होतें. प्रत्यक्ष युद्धाच्या अनुभवानें हिंदुस्थानांत यंत्रें व यांत्रिक वाहनें तयार करण्याचें महत्त्व सरकारास पटून ह्या व इतर उच्च प्रतीच्या यांत्रिक धंद्यांस उत्तेजन मिळालें तर वाईटांतून बरें ह्या नात्यानें तें इष्टच म्हटलें पाहिजे. हिंदी शिष्टमंडळांत येथील धंदेवाल्यांचे प्रतिनिधि असणें हें मुख्यत्वेंकरून परिषदेचा येथील उद्योगधंद्यांवर चिरकालीन इष्ट परिणाम होण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे. येथील चालू बाजारांतून व सरकारी कारखान्यांतून साम्राज्यांतील कांहीं घटकांच्या तात्कालिक गरजा भागल्या तर त्यांत हिंदी राष्ट्रास विशेष महत्त्व वाटणार नाहीं.

ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानाला स्वायत्त वसाहतींचें स्थान प्राप्त करून देण्याची ब्रिटिश सरकारची जर मनापासून इच्छा असेल तर हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीची सध्याची संधि त्यांनीं मुळींच दवडतां कामा नये. एकंदर साम्राज्याच्या व विशेषतः हिंदुस्थानाच्या लष्करी संरक्षणाकरितां ज्या ज्या धंद्यांच्या वाढीची जरूर आहे त्या सर्वांची तात्काल संस्थापना करण्याच्या मार्गास त्यांनीं लागलें पाहिजे. भांडवल, यंत्रसामुग्री व अनुभवी कारागीर ह्यांची जरूर व शक्य तितकी मदत इंग्लंडकडून होईल अशी अपेक्षा करणें गैरवाजवी नाहीं. इतर वसाहतींत असा उपक्रम आधींच झाला आहे. ह्या सर्व बाबतींत हिंदुस्थानानें स्वावलंबी असणें हें साम्राज्याच्याहि हिताचें असलें तरी तें तात्काल शक्य नाहीं. युद्धांत हिंदुस्थानाची पूर्णपणें मदत करून घ्यावयाची असल्यास ती येथील औद्योगिक व यांत्रिक उत्पादन वाढविल्यानेंच होईल. हिंदुस्थान सरकार व हिंदी धंदेवाले ह्यांच्या सहकार्यानें आगामी आर्थिक परिषदेला साम्राज्यसंरक्षणासाठी पुष्कळच सहाय मिळवितां येण्यासारखें आहे.

---

## बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक

### अध्यक्ष, श्री. रमणलाल सरय्या, ह्यांचें भाषण

गेल्या शनिवारीं मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा भरली होती आणि तीमध्यें डायरेक्टरांचा वृत्तांत, ताळेबंद व नफातोटापत्रक हीं मान्य करण्यांत आलीं. त्याचप्रमाणें व्यक्तिशः भागीदारांच्या वतीनें सात डायरेक्टरांची निवड होऊन ३½ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. ह्या प्रसंगीं अध्यक्ष, श्री. रमणलाल सरय्या, ह्यांनीं गेल्या वर्षांतील बँकेच्या कार्याचें व एकंदर आर्थिक परिस्थितीचें सिंहावलोकन केलें. शेतीच्या मालाचे भाव युद्धपरिस्थितीमुळें चढतील अशी सार्वत्रिक अपेक्षा होती ती अखेर खरी ठरली नाहीं, ह्यासंबंधांत तुलनात्मक आकडे देऊन ते म्हणाले:—

"बाजारभावांत अपेक्षित चढ न होण्याचें मुख्य कारण हिंदी मालाचें युरोपांतलें गिऱ्हाइक युद्धामुळें तुटलें हें होय. ह्या अडचणींत रेल्वेजच्या वाहतुकीच्या दरांत झालेल्या चढीची आणि हुंडणावळीवरील नियंत्रणाची भर पडली आहे. ग्रेट ब्रिटननें साम्राज्यांतील बराच कच्चा माल विकत घेऊन टाकला आहे, ह्या धोरणाचा हिंदी मालास उपयोग होईल अशाविषयी हिंदुस्थान सरकारनें वेळींच काळजी घेतली पाहिजे. ह्या प्रांतांतल्या कांहीं भागांत, विशेषतः गुजराथ, नाशिक, पश्चिम खानदेश, ठाणें इकडे पिकांची स्थिति असमाधानकारक होती आणि दोहद व विरमगांवच्या बाजूस दुष्काळी कामेंहि काढावीं लागलीं. ह्या गोष्टीचा प्रतिकूल परिणाम बँकेच्या व्यवहारावर होणें स्वाभाविक होतें.

"बँकेच्या जवळील पैशाच्या रकमेमध्यें पूर्वीच्या वर्षाच्या मानानें गेल्या सालीं विशेष बदल झाला नाहीं. सोसायट्यांचेकडील ठेवींमध्यें थोडी वाढ झालेली दिसेल. हा आकडा अधिक वाढला असता, परंतु युद्धाचे प्रारंभीं इतर कांहीं बँकांप्रमाणें आम्हांसहि कांहीं वेळपर्यंत ठेवींच्या परत मागणीस तोंड द्यावें लागलें. तथापि विशेष अडचण न भासतां आपल्या सहकारी बँकांस मागणीस अनुसरून ठेवी परत देतां आल्या ह्यावरून त्यांच्या मजबुतीचा समाधानकारक पुरावा मिळाला आहे. सप्टेंबर–ऑक्टोबर आणि मे–जून महिन्यांत दोन्ही प्रसंगीं २५–३० लक्ष रुपयांची मागणी भागवतां आली हें प्रांतिक बँक व तिला जोडलेल्या सहकारी बँका ह्यांची पैसा तरता ठेवण्याची व्यवस्था आणि दक्षतेचा कारभार ह्यांविषयीं चांगली परीक्षा झाली आणि तिच्या कसास ह्या संस्था उतरल्या हें त्यांस भूषणावह आहे.

"दुसऱ्या एका महत्त्वाच्या बाबीचा येथें उल्लेख करणें आवश्यक आहे. युद्धाचा परिणाम सरकारी कर्जरोख्यांच्या किंमती घटण्यांत झालेला आहे. बँकेच्याजवळील रोखे बहुतेक अल्पमुदतीचे आहेत आणि त्यांतले पुष्कळसे दर्शनी किंमतीपेक्षा कमी भावानें खरेदी केलेले आहेत. तेव्हां त्यांचेविषयीं कांहीं प्रश्नच नाहीं. दर्शनी किंमतीपेक्षा अधिक दरानें खरेदलेल्या रोख्यांचे हातीं येणारे पैसे खर्चलेल्या रकमेपेक्षा कमी असल्यानें ह्या फरकाची तरतूद वार्षिक नफ्यामधून केली पाहिजे. ह्याप्रमाणें हिशेब करण्यांत आला असून गेल्या वर्षासाठी १६ हजार रुपये बाजूस काढून ठेवण्यांत आले आहेत. गेल्या वर्षापेक्षा डिव्हिडंडचा दर यंदा अर्ध्या टक्क्यानें कमी केलेला आहे ह्या गोष्टीचाहि निर्देश करणें आवश्यक आहे. बँकेच्या मजबुतीच्या दृष्टीनें कर्जरोख्यांची व्यवस्था झाली आहे आणि सध्याच्या परिस्थितींत सावधगिरीचें धोरण अंगिकारणें अगत्याचें आहे. ह्या कारणामुळें डिव्हिडंड कमी करावें लागलें आहे. बँकेच्या नोकरांस बोनसहि देतां आलेलें नाहीं; पण त्यास इलाज नाहीं.

"शेतीचा माल, कर्जरोखे वगैरेंच्या तारणांवर दिलेल्या कर्जांत ७ लक्ष रुपयांच्या वाढ झालेली आहे, ही गोष्ट प्रगतीचें लक्षण आहे. लांब मुदतीच्या कर्जांत व लिक्विडेशनमधल्या सोसायट्यांकडील कर्जांत घट झाली आहे ही तशीच समाधानाची गोष्ट आहे. कित्येक ठिकाणीं कर्जदारांच्या येण्याचा तडजोडीनें निकाल लावण्यांत आला असल्यानें थकलेल्या व्याजाची रकम खाली गेली आहे. मागें जमिनीच्या तारणावर दिलेली कर्जें प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेनें स्वतःकडे घेण्याचा प्रश्न तसाच भिजत पडला आहे. कांहीं कर्जें त्या बँकेकडे वर्ग झालीं आहेत, पण बरींच व्हावयाचीं राहिलीं आहेत. ह्या बाबतींत आलेल्या नुकसानीची आम्हांस भरपाई होण्याची तशीच राहून गेली आहे, ह्या गोष्टीचा सरकारनें लवकर निकाल लावला पाहिजे. बँकेच्या डायरेक्टरांनीं प्रगतीच्या योजनांकडेहि लक्ष पुरवलें आहे. मल्टिपर्पज सोसायट्यांस पैसा पुरवण्याविषयींचे नियम तयार झाले असून शेतमालाच्या विक्रीबाबतच्या व्यवस्थेस बँक सहाय देत आहे. सहकारी बँकांची मध्यवर्ती संस्था स्थापन झाली आहे तिनें उत्कृष्ट कार्य चालविलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. टेक्सटाइल इन्क्वायरी कमिटीचें काम आपण करीत असतांना बँकेकडून सेवेचा पगार घेणें योग्य नाहीं, असें म्हणून श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं निम्मा पगार सोडून दिला आहे. ह्या त्यांच्या स्वार्थत्यागाचा गौरवपर उल्लेख करणें हें माझें कर्तव्य आहे."

---

# स्फुट विचार

## युद्धखर्च, कर आणि कर्ज

ब्रिटिश सरकारास युद्धाप्रीत्यर्थ अवाढव्य खर्च करावा लागत आहे, तो प्रस्तुत आणीबाणीच्या प्रसंगीं अपरिहार्य आणि अगत्याचा आहे, ह्याविषयीं इंग्लंडमध्यें जनतेंत पूर्ण ऐकमत्य आहे. लढाऊ सामुग्रीचें उत्पादन आणि पुरवठा वाढवण्याची आवश्यकता सर्व लोकांस इतकी पटलेली आहे कीं, ब्रिटिश फडनविसांनीं पार्लमेंटला सादर केलेलें अंदाजपत्रक अपुरें आहे असा अभिप्राय कित्येकांनीं व्यक्त केला आहे. ह्यावरून ब्रिटिश जनतेचा युद्धाचे संबंधांतला उत्साह उघड होतो, एवढेंच नव्हे, तर जर्मनीसारख्या बलाढ्य शत्रूवर विजय मिळवण्यास लागेल तो खर्च करून आपली लढाऊ शक्ति वाढवली पाहिजे ह्याविषयींचें सामान्य ज्ञानहि प्रकट होतें. एक वर्षांत तीनशें कोटि पौंड सरकारी खर्च होईल. ह्या अंदाजापेक्षां प्रत्यक्ष खर्च अधिक होणार असून त्याची तजवीज करणें आवश्यक आहे अशा अर्थाची सूचना ब्रिटिश फडनविसांस करण्यांत आली आहे. युद्धास लागणाऱ्या खर्चाच्या रकमेचा कांहीं भाग करांच्या स्वरूपांत उभा करण्यांत यावयाचा असून बाकीचें कर्ज काढण्यांत यावयाचें आहे. कर आणि कर्ज ह्यांचें परस्पर प्रमाण फडनविसांनीं राखलें आहे, त्यावर होणारी टीका विचारांत घेण्यासारखी आहे. करांच्या मार्गानें जनतेच्या मिळकतीचा जो अंश तिजोरींत घेतला जात आहे, तो जरूरीच्या मानानें कमी प्रमाणांत असल्यामुळें नागरिकांच्या हातांत त्यांच्या खर्चासाठी पैसा उरतो तो वाजवीपेक्षा अधिक आहे असा ह्या टीकेचा आशय आहे. लोकांनीं वापरावयाच्या जिनसांस सरकारनें मर्यादा घातली आहे आणि देशांतील कारखाने युद्धोपयोगी माल तयार करण्यांत गुंतले आहेत. ह्या परिस्थितींत लोकांच्या हातांतील पैशाचा विनियोग पूर्णपणें होण्यास वाव मिळणें शक्य नाहीं असें टीकाकारांचें म्हणणें आहे. खर्चास वाव नसल्याकारणानें शिल्लक राहणारा पैसा जनतेनें कर्जाचे स्वरूपांत सरकारच्या स्वाधीन करावा असें त्यांस उत्तर देतां येण्यासारखें आहे. येथें असा युक्तिवाद करतां येईल कीं, कर वाढवले जाऊन जनतेच्या मिळकतीचा मोठा भाग तिच्या हातांतून घेतला गेल्यास युद्धास उपयोगी नाहींत असे जिन्नसहि विकले आणि खरीदले जाणार नाहींत. लोकांचा खर्च मर्यादित करण्याचें धोरण यशस्वी होण्यास त्यांनीं केलेल्या काटकसरीचा उपयोग युद्धसामुग्रीचा पुरवठा वाढण्यांत झाला तरच कराच्या मार्गानें जनतेच्या प्राप्तीचा मोठा अंश तिजोरींत घेण्यांत स्वारस्य आहे असें म्हणतां येईल. गरिबांनीं काटकसर केली असतां त्यांनीं न वापरलेल्या जिनसांच्या उत्पादनांत गुंतलेले कामकरी बेकार होतील, त्यास सरकारनें काम दिलें पाहिजे. नाहीं तर ह्या लोकांस काम उरणार नाहीं आणि त्यांचा उपयोग दुसरीकडे केला जाणार नाहीं. ह्या विवेचनावरून कर आणि कर्ज ह्यांचें परस्पर प्रमाण राखण्याचें काम किती गुंतागुंतीचें व अवघड आहे ह्याची कल्पना येईल. ब्रिटिश फडनविसांनीं करांमध्यें वाढ करून ह्या उपायानें सरकारी उत्पन्न वाढवावें अशी सूचना करणारांनीं त्या प्रश्नाच्या दुसऱ्या सहज लक्षांत न येणाऱ्या बाजूंचा विचार करणें आवश्यक आहे ह्यांत संशय नाहीं.

---

## वेढा कोणास पडला आहे? जर्मनीला का इंग्लंडला?

इंग्लंडच्या विरुद्ध पादाक्रांत केलेल्या देशांतील लोकांचें मत कलुषित करण्यासाठी जर्मन सत्ताधारी असें भासवीत आहेत कीं, त्यांच्या उपासमारीस इंग्लंड जबाबदार आहे. जर्मनीस माल बाहेरून येऊन पोहोंचूं नये म्हणून इंग्लंडनें सबंद युरोपाची नाकेबंदी केली आहे असें एकाबाजूनें म्हणावयाचें आणि समुद्रावर आपण ब्रिटिश व्यापारी जहाजें बुडवून ग्रेटब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार बंद पाडीत आहों अशी घमेंड दुसऱ्या बाजूनें मारावयाची ह्यांत असलेली विसंगति जर्मन सत्ताधाऱ्यांनीं झाकण्याचा प्रयत्न केला तरी ती सहज लक्षांत आल्यावांचून रहाणें अशक्य आहे. हॉलंड, बेल्जम, डेन्मार्क व फ्रान्स हे देश जर्मनीच्या ताब्यांत आल्यापासून त्यांतील लोकांस अन्नाचा व इतर जिनसांचा पुरवठा होईल अशी तजवीज करण्याची जबाबदारी शत्रुराष्ट्रावर येऊन पडली आहे. वरील देश तटस्थ होते तेव्हां त्यांच्या स्वतःच्या उपयोगास लागणारा माल ब्रिटिश आरमार त्यांस मिळूं देत होतें. त्या मालाचा थोडा अंशहि जर्मनीच्या हातीं जाऊं नये एवढ्यापुरताच ब्रिटिश सरकाराचा कटाक्ष होता. आतां सर्व महासागर इंग्लंडला मोकळे आहेत आणि शत्रूनें कितीहि खटपट केली तरी अमेरिका आणि इतर देश ह्यांच्याशीं ब्रिटिश व्यापार चालू आहे. परराष्ट्रीय मालाविषयींच्या स्वतःच्या आणि स्वतःच्या भोंवतालच्या देशांच्या गरजा भागवण्याची अवघड जबाबदारी जर्मनीस पुरी पाडली पाहिजे. इंग्लंडच्या आरमारी सामर्थ्यापुढें जर्मनीची व्यापाराचे बाबतींत कांहींच मात्रा चालत नाहीं ही वस्तुस्थिति आहे. तिचा विपर्यास जर्मन सत्ताधाऱ्यांनीं कितीहि केला तरी त्यांनीं पादाक्रांत केलेल्या शेजारी देशांतील लोक फसणें शक्य नाहीं. स्वतःच्या उपासमारीचें खापर ते जर्मनीच्या डोक्यावर फोडल्यावांचून रहाणार नाहींत. आपल्या पाणबुड्या व विमानें ह्यांचे सहायानें ब्रिटिशांनीं चालवलेली नाकेबंदी आपण मोडून टाकूं एवढेंच नाहीं तर उलट, आपण ब्रिटिश परराष्ट्रीय व्यापाराची नाकेबंदी करूं ही जर्मनीची घमेंड व्यर्थ ठरली आहे ही गोष्ट सिद्ध आहे.

---

## लंडनवर जर्मनीचे रानटी हल्ले

गेल्या दोन आठवड्यांत युरोपांतील युद्धास विशिष्ट स्वरूप प्राप्त झालें आहे त्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. सशस्त्र सैनिकांनीं सशस्त्र प्रतिस्पर्ध्यांशींच सामना करावयाचा आणि बिनलढाऊ व निःशस्त्र जनतेवर आघात करावयाचा नाहीं असा शिष्टसंमत युद्धप्रघात आहे असें जगभर आजवर मानण्यांत आलें आहे. युद्धाचे डावपेंच व लढ्यांच्या हालचाली ह्याच तत्वावर चालल्या पाहिजेत अशी सुधारलेल्या राष्ट्रांतली ठाम समजूत आहे. परंतु अलीकडे जर्मनीनें लंडनवर हवाई हल्ले करण्याचा क्रम चालवला आहे त्यांत वरील युद्धनीतीस हरताळ फासण्यांत येत आहे ह्यांत आतां शंका राहिलेली नाहीं. युद्धाच्या मान्याच्या जागा व लढाईचीं साधनें ह्यांचेवर जर्मन विमानांनीं स्फोटकारक गोळे टाकले असते तर त्या कृत्याचा निषेध करण्याचें कारण नव्हतें. हिटलरनें इंग्लंडवर मोठ्या जमावानें स्वारी करण्याची आणि पश्चिम युरोपांतील देशांप्रमाणें ब्रिटिश बेटें पादाक्रांत करण्याची लढाऊ तयारी चालवली आहे तिची पांगापांग करण्यासाठींच ब्रिटिश विमानें जर्मनीवर आणि फ्रेंच किनाऱ्यांवरील बंदरांवर हल्ले चढवीत आहेत. इंग्लंडवरील नियोजित स्वारी

यशस्वी होण्यास सामानसुमानाची, जहाजांची व सैनिकांची जुळवाजुळव हिटलर करीत आहे, ती उधळून लावणें हाच केवळ ब्रिटिश विमानांच्या रोजच्या कार्यक्रमाचा उद्देश आहे. आपली इंग्लंडवरील चढाईची तयारी निष्फळ होत आहे, हें पाहून हिटलरनें चिडून जाऊन लंडनवर चोहोंकडे बाँब टाकण्याचा हुकूम आपल्या वैमानिकांस दिला आहे हें स्पष्ट दिसत आहे. लंडनवर उंच ढगांत उडून जावयाचें आणि तेथून खालीं स्फोटकारक गोळे सोडून द्यावयाचे हा रानटी प्रकार जर्मन विमानांकडून अलीकडे बेगुमानपणानें होत आहे. प्रार्थनालयें, रुग्णालयें, शाळा, दुकानें, खाजगी घरें, मजूरांच्या चाळी ह्यांचा नाश जर्मन विमानांनीं मांडला आहे. ह्यांत कोणताच लष्करी उद्देश साध्य होत नसून बिन लढाऊ जनतेची व बायकामुलांची हानी होत आहे. युद्धाचा हा रानटी प्रकार आहे. ब्रिटिश जनतेस घाबरवून सोडावयाचें हा त्याचा हेतु मात्र साध्य होत नाहीं. लंडनचे रहिवासी शत्रूच्या हल्ल्यांस शांतपणानें तोंड देत आहेत आणि त्यानें घरांचीं जाळपोळ चालवली तरी आपल्या व्यवहारांत व्यत्यय न येऊं देण्याचा त्यांचा कृतनिश्चय आहे. लढाऊ कारखान्यांच्या उत्पादनांत कामकरी लोक शत्रूच्या हल्ल्यांमुळें खंड पडूं देत नाहींत, आणि लंडनचे रोजचे व्यवहार नेहमीप्रमाणें चालले आहेत. राजधानीच्या बचावाची व्यवस्था कार्यक्षम व्हावी ह्यासाठी प्रधान मंडळ अविरत खटपट करीत आहे. जनतेस खाण्यापिण्याच्या जिनसांचा पुरवठा अव्याहत चालू राहील अशी तजवीज करण्यांत आली आहे. ब्रिटिश लोकांचा ह्या तऱ्हेचा धिमेपणा आणि येईल त्या संकटास तोंड देण्याचा निश्चय ही वाखाणण्यासारखीं असून त्यांनीं जगाचें सकौतुक लक्ष आपणाकडे आकर्षून घेतलें आहे. लंडन वरील रानटी हल्ल्यांनीं ब्रिटिश जनतेची हिंमत खचेल ह्या हिटलरच्या अपेक्षेचा फोलपणा स्पष्ट होत आहे. लढाऊ महत्वाच्या ठिकाणांवरच आपल्या विमानांचे हल्ले होत आहेत ह्या जर्मन सत्ताधाऱ्यांच्या विधानांचा खोटेपणा सिद्ध करण्यास निराळा पुरावा देण्याचें प्रयोजन नाहीं.


---

## " अग्रणी "

श्री. वा. न. शिखरे ह्यांचे संपादकत्वाखालीं निघत असलेल्या अग्रणी साप्ताहिकाचा दुसऱ्या वर्षाचा प्रथमांक युद्धाचा विशेष अंक म्हणून प्रसिद्ध झाला आहे. " आपल्या बुद्धिवादी भूमिकेवरून सर्व पक्षांतील सत्तत्त्वांचें ग्रहण करावें, सत्याशीं प्रतारणा न करतां वाचकवर्गाला कोणत्याहि प्रश्नाचे आधीं संपूर्ण ज्ञान द्यावें आणि मग राष्ट्रहिताच्या दृष्टीनें आपल्याला इष्ट वाटणाऱ्या धोरणाचा पुरस्कार करावा " हें ध्येय अग्रणीनें आपल्या पहिल्या अंकांतच जाहीर केलें, आणि त्या ध्येयास अनुसरूनच हा विशेषांक काढण्यांत आला आहे. अंकांतील प्रो. काळे ह्यांच्या लेखाचा मथितार्थ, " आर्थिक दमदारपणा हेंच युद्धांतील यशाचें मूळ " असा आहे. श्री. द. वि. आपटे ह्यांनीं, हिंदुस्थानवर चालू युद्धाचे काय परिणाम होतील ह्याचें विवेचन केलें आहे. जपान व इंग्लंड ह्यांचें युद्ध जुंपेल काय ? हा श्री. त्र्यं. वि. पर्वते ह्यांच्या लेखाचा विषय आहे. इतर विषयांवरहि कांहीं लेख ह्या अंकांत आले आहेत.


# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट




१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं

STEVENS CO. CROMWELL CONN USA.

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि पायदळ पळतात आणि चोर व शत्रु ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर १५ काडतुसें असतात. नं. ९९९ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

## व्याजाचे दर चालू युद्धांत इतके कमी कां?

( इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स ह्या संस्थेच्या पुणें केंद्रातर्फें ता. १८ सप्टेंबर रोजीं भरलेल्या सभेंत प्रो. द. गो. कर्वे ह्यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश. )

व्याजाचें तात्त्विक स्वरूप ठरवितांना जुन्या अर्थशास्त्रज्ञांनीं पैशाचा प्रश्न सर्वस्वीं बाजूस ठेवला होता. कर्जाचें माध्यम पैसा हें असलें तरी वास्तविकपणें उत्पादनास लागणाऱ्या जिनसांची उसनवार होत असते म्हणून भांडवलाच्या साहायानें धंदेवाल्याच्या उत्पन्नांत जेवढ्या अधिक जिनसांची भर पडते त्या प्रमाणांत भांडवलावरील व्याज ठरतें, असा सिद्धांत त्यांनीं मांडला होता. अशा ठोकळ सिद्धांताच्या साहायानें व्याजाचे दरांतील चढउतारांचा पूर्णपणें उलगडा होत नाहीं. कारण अनेक वेळां पेन जिनसी भांडवलाच्या उत्पादन सामर्थ्यांत होणाऱ्या फरकांहून व्याजाचे दरांतील बदल निराळ्या प्रकारचे होत असतांना दिसतात.

व्याजाचे दर हे मुख्यत्त्वेंकरून पैशाच्या उसनवारीचे निमित्तानें ठरत असल्यानें पैशाचा पुरवठा व त्यास असलेली मागणी ह्यांचाही व्याजाच्या दरावर परिणाम होतो. किंबहुना तात्कालिक फरकांच्या दृष्टीनें पाहिलें तर उत्पादन सामर्थ्याहून पैशाच्या मागणी–पुरवठ्याचेंच महत्त्व अधिक आहे. अलीकडे पैसा हाही धातुमय न राहतां सरकारी पतीवर निघणारा कागदी तुकडा झाल्यानें त्याचा पुरवठा अधिक सढळपणें करणें शक्य होतें. चलनाचा पुरवठा बेसुमार होऊं न देतां अनेक मार्गांनीं कागदी चलनाची टंचाई कमी करतां येते.

बँका आपलीं कर्जें देतांना मध्यवर्ती पेढीच्या धोरणाकडे बघतात व मध्यवर्ती पेढीस जरूर तें कागदी चलन काढण्याची परवानगी सरकारकडून मिळते. ह्यामुळें कर्जें देण्याचे बाबतींत पूर्वी एकप्रकारचें नाण्याचें नियंत्रण असे तें आतां मुळींच राहिलें नाहीं. शिवाय, १९ व्या शतकांत बहुतेक युरोपियन व अमेरिकन राष्ट्रांची संपत्ति अनेक पटींनीं वाढल्यानें त्यांची बचतही पुष्कळ झालेली आहे. त्या मानानें लोकसंख्येची वाढ कमी असून अलीकडे तर धंद्यांच्या निमित्तानेंही भांडवलास फारशी मागणी नाहीं. ह्यामुळें व्याजाचे दर उतारास लागले असतांच युद्धाची तयारी सुरू झाली.

भांडवलाचा व पैशाचा पुरवठा करण्याची आधुनिक साधनें ध्यानांत घेऊन इंग्लंडमध्यें आधींच व्याजाच्या दरांबद्दल नियमित धोरण स्वीकारण्यांत आलें होतें. सरकारमार्फत मध्यवर्ती बँकेला व त्या बँकेमार्फत इतर बँकांस व धंदेवाल्यांस सढळ हातानें चलन पुरविलें जात होतें. तसेंच, सरकारी खर्चानें चाललेल्या मोठमोठ्या सार्वजनिक कामांमुळेंही लोकांमध्यें पैसा पेरला जात होता. उलट, लोकांचा खर्च कमी व्हावा म्हणून जिनसांचा पुरवठा मर्यादित करून त्यांच्या किंमतीही फार वाढूं दिल्या नाहींत. अशा रीतीनें नव्यानें पुरविलेल्या पैशापैकीं बहुतेक भाग बचत होऊन परत बँकांकडे येईल अशी व्यवस्था केली होती.

उलट, लोकांच्या हातांतील पैशांस खाजगी इसमांची मागणी येऊं नये ह्याकरितां सर्व परदेशीं कर्जें रद्द करण्यांत आलीं व खाजगी कर्जें देण्यासंबंधींही बँकांवर नियंत्रण घालण्यांत आलें. अशा तऱ्हेनें वाढत्या भांडवलास सरकार हेंच एक मुख्य ऋणको उभें राहिल्यानें व्याजाचा दर कमीच राहिला. बाजारभाव नियंत्रित, नफा झालाच तर त्यावर जबर कर, अशा परिस्थितींत व्यापारी भांडवलासही भारी व्याजानें मागणी नाहीं. शिवाय, सर्व वर्गांची राष्ट्रभावना जागृत करून कर्ज देणें हें इतर राष्ट्रकार्यांसारखेंच राष्ट्रकार्य असा भाव उत्पन्न केला गेला. भांडवलाचा सर्वच बाजार मर्यादित केल्यानें व त्यामध्यें नफेबाजीबरोबरच राष्ट्राभिमान घुसडल्यानें कमी दरानें कर्ज मिळणें शक्य झालें आहे.

व्याजाच्या नियमनाबरोबरच किंमती, नफा, नवे धंदे, इत्यादिकांचे नियमन करणें जरूर पडत आहे. युद्धाचे दुसरे परिणाम कोणतेही होवोत, एवढें मात्र खरें कीं युद्धोत्तर आर्थिक घटनेंत नियोजनाचें तत्त्व फार मोठ्या प्रमाणांत अंमलांत येणार. नियोजित संघटनेस अनुसरून व्याजाचे दरही नियमित होणार ह्यांत शंका नाहीं. भांडवलाचे बाजारांत सरकारनें मक्तेदारी प्रस्थापित न केली तरीही व्याजाचे दर आतां इंग्लंडसारख्या देशांत २–३ टक्क्यांपेक्षा वर जाणें दुरापास्त आहे. ह्या परिस्थितीचा इतर राष्ट्रांतील दरांवरही अचुक परिणाम होत राहणार.

---

## जमीनदारांस गव्हर्नरांचा सल्ला

### शेतीकडे लक्ष द्या, उत्पन्न वाढवा.

पुणें येथें ता. १७ रोजीं सरदारांचा दरबार भरला होता, त्यावेळीं गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या भाषणांत मुंबई प्रांतांतील शेतीच्या परिस्थितीचा उल्लेख केला. ते म्हणाले:—

“ मान्सुन पाऊस यंदा आतांपर्यंत समाधानकारक झाला आहे. गेल्या वर्षीं अनेक जिल्ह्यांत दुष्काळ होता, तो ह्या वर्षीं पडणार नाहीं, असें दिसतें. चाऱ्याचा पुरवठा पुरेसा आहे व शेतीच्या जनावरांची स्थिति समाधानकारक आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या व तुमच्या स्वतःच्या कुळांच्या हितासाठी तुम्हीं शेतीच्या मालाच्या उठावाकडे लक्ष पुरविलें पाहिजे, व सध्यासारख्या परिस्थितींत त्याची तर विशेष आवश्यकता आहे. पूर्वींच्या कांहीं बाजारपेठा आतां नाहींशा झाल्या असून कांहीं मालास नवी मागणी निर्माण झाली आहे. जगांत आज संपत्तीचा प्रचंड नाश होत आहे, ती पुनः निर्माण करण्याचें तुमचें कर्तव्य आहे. तुम्हीं स्वतः कसून प्रयत्न केला व तुमच्या कुळांसहि तुम्हीं प्रवृत्त केलें तरच हें शक्य आहे.

“ शेतीची मुख्य मदार जनावरांवर आहे. व्हाइसरॉयसाहेबांच्या प्रोत्साहनामुळें जनावरांची सुधारणा होण्यास पुष्कळ प्रयत्न गेलीं कांहीं वर्षें झाले; ते कायम टिकवले पाहिजेत. मेंढ्यांमध्यें सुधारणा करण्याचा शेतीखातें प्रयत्न करीत आहे. कोंबड्यांच्या बाबतींतहि प्रयत्न चालू आहेत. जनावरांस मुबलक चारा मिळण्याची व्यवस्था होणेंहि अगत्याचें आहे. चाऱ्यासाठी मुद्दाम लागवड करण्याकडे अद्याप कोणाचें विशेष लक्ष गेलेलें नाहीं. पाऊस अपुरा पडतो तेथें पाणी साठवितां कसें येईल व अति पावसानें माती धुपून जाण्याचें कसें टाळतां येईल हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. सोलापूर व विजापूर येथें ह्याबाबत संशोधनकार्य चालू आहे. कमी पाऊस पडला तरी सोप्या व बिनखर्चीं पद्धतींनें पिकाचें उत्पादन दुपटीनें वाढवितां येणें शक्य आहे, असा संशोधनाचा निष्कर्ष आहे. शेतकऱ्यास ह्या पद्धती समजावुन सांगण्याचें काम चालू आहे. तुम्हीं संशोधनाच्या केंद्रांस भेटी देऊन व शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांस भेटून ह्या गोष्टी समजून घ्या. इतरहि अनेक बाबतींत ते अधिकारी तुम्हांस सल्ला देऊं शकतील. आपल्या कुळांस व शेतकऱ्यांस मदत करीत जा. नवीन कुळकायद्याची तुम्हांपैकीं कित्येकांस भीति वाटते. कुळांस तुमचेबद्दल प्रेम व आदर वाटत असल्यानंतर कोणत्याहि कायद्याची तुम्हांस भीति रहाणार नाहीं. मात्र, त्यांचे संबंधांत तुम्हीं कर्तव्य केलें नाहीं, तर मात्र तुमचें भवितव्य डळमळित होईल, हें उघड आहे. ”

## मुंबई प्रांतांतील उद्योगधंद्यांची सर्वसाधारण स्थिती

### मुंबई प्रांताच्या उद्योगखात्याचा अहवाल १९३८–३९

अहवालाचे सालांत शेतींत पैदा होणाऱ्या मालपैकीं मुख्य मुख्य मालासाठींची मागणी व त्यांचे भाव अतिशय उतरले. त्यामुळें जनतेची आधींच अतिशय कमी झालेली क्रयशक्ति आणखी कमी झाली. यामुळें प्रांतांतील उद्योगधंद्यांचे बाबतींत झालेली प्रगति बंद होईल अशी भीति वाटत होती. परदेशी मालाच्या आयातींतहि घट दिसून आली व अहवालाचे सालीं नाणें बाजार नरम होता. अहवालाचे सालीं नवीन कारखाने फारच थोडे निघाले.

“ कृत्रिम रेशीम तयार करण्याचा उद्योगधंदा ” व “ इंजिनियरिंग इंडस्ट्री ” हे सोडून दिल्यास उद्योगधंद्याच्या कारणांसाठीं विजेची शक्ति वापरण्याचें प्रमाण कमी होतें आणि सदरहु सालांत उद्योगधंद्यांतून निर्माण झालेला माल गेल्या वर्षीं तयार झालेल्या मालापेक्षा कित्येक बाबतींत सरासरीनें जास्त असला तरी उद्योगधंद्यांतून पैदा होणाऱ्या मालाचे प्रमाणाचा कमी होण्याकडे कल होता. अहवालाचे सालीं गेल्यावर्षाचे मानानें, उद्योगधंदेविषयक व इतर कंपन्या नवीन अशा कमी स्थापन झाल्या, आणि उद्योगधंद्याच्या सिक्युरिट्यांच्या बाजाराचा कल मंदीकडे होता.

### कापडाच्या गिरण्या

प्रांतांतील प्रमुख धंदा, म्हणजे कापसाच्या सुतानें कापड तयार करण्याचा धंदा. याची स्थिती मागील सालीं जशी होती तशी चांगली अहवालाचे सालीं नव्हती. गिरण्यांची एकूण संख्या चारानें कमी होऊन रात्रपाळी मुंबई व अहमदाबाद या दोन्ही शहरांत फारच कमी होती. लोकांची क्रयशक्ति अतिशय कमी झाल्यामुळें व जपानच्या चढाओढीनें त्यांत आणखी भर पडल्यानें हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या कापडाला हिंदुस्थानांतच मागणी कमी येऊं लागली. तसेंच, जपानच्या तीव्र चढाओढीमुळें व इजिप्तसारख्या देशांनीं सुती कापडाच्या आयातीवर नुकताच निर्बंध बसविल्यामुळें हिंदुस्थानाबाहेर समुद्रापलीकडील देशांच्या बाजारांत हिंदी कापड निर्यात करण्यास अडचण येऊं लागली.

### लोकरीचे व कृत्रिम रेशमाचे जिन्नस

लोकरीच्या उद्योगधंद्याच्या परिस्थितींत जवळजवळ कांहींच फरक झाला नाहीं. तथापि पायमोजे वगैरेसारखे जिन्नस तयार करण्याच्या उद्योगधंद्याची अहवालाचे सालीं पीछेहाट झाली आणि प्रांतांतल्या प्रांतांत तयार होणारा माल व परदेशांतून आयात झालेला माल या दोहोंत विशेष प्रमाणांत उतार दिसून आला. अहवालाचे सालीं कृत्रिम रेशीम तयार करण्याचे कारखान्यांच्या संख्येंत झपाट्यानें वाढ झाली, व त्याचा परिणाम असा झाला कीं माल जास्त प्रमाणांत तयार होऊं लागल्यामुळें आपआपसांत आर्थिकदृष्ट्या घातक अशी चढाओढ चालावली.

### इतर उद्योगधंदे

बाकीच्या उद्योगधंद्यांपैकीं तेलाच्या गिरण्या, वनस्पतिजन्य तूप तयार करण्याचे कारखाने, ॲल्युमिनियमचे कारखाने, साबण तयार करण्याचा उद्योगधंदा, रसायनें तयार करण्याचा (केमिकल) उद्योगधंदा ( मोठ्या प्रमाणांत रसायनें तयार करण्याचा उद्योगधंदा सोडून ) आणि इंजिनिअरिंगचा उद्योगधंदा ( विशेषेंकरून इमारती व इतर बांधकामें ) यांची स्थिती एकंदरींत चांगली असल्याचें दिसून आलें. गॅस मँटल तयार करण्याच्या उद्योगधंद्याच्या स्थितींत हळुहळु सुधारणा होत असल्याचें दिसून आलें. खासरेच्या कारखान्यांतून माल फारच कमी प्रमाणांत तयार होत असे. लिमलेट, चॉकोलेट वगैरे तयार करण्याचा उद्योगधंदा, कलाकुसरीचा उद्योगधंदा व कांचेच्या वस्तू तयार करण्याचा उद्योगधंदा या उद्योगधंद्यांस आपआपसांतील भरमसाट चढाओढीमुळे नुकसान पोंचत असे. शेवटच्या म्हणजे कांचेच्या वस्तू तयार करण्याच्या उद्योगधंद्यास जपानच्या चढाओढीचीहि झळ लागली. देशी सिगारेट तयार करण्याचा उद्योगधंदा हिंदुस्थानांत चालू असलेले परदेशी कारखाने यांच्या गैरवाजवी चढाओढीमुळें नुकसानींत आला.

---

### जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. भिवंडी

वरील कंपनीचा पहिला, ३० जून १९४० अखेरचा वार्षिक रिपोर्ट आमचेकडे आला आहे. अहवालाचे वर्षी युद्ध–परिस्थितीमुळें कच्च्या मालाच्या किंमती वाढल्या, तरी तयार मशिनरीची विक्रीची किंमत त्या प्रमाणांत चढली नाहीं. कंपनीनें आपल्या व्यवहारांत चांगलें यश संपादन केलें आहे. कंपनीच्या मालाची विक्री केवळ हिंदुस्थानांतच होत नसून आफ्रिका, ब्रह्मदेश इकडेहि तिची मशिनरी खपते व इतर देशांतूनहि विचारणा होऊं लागली आहे. घसारा काढून व सर्व खर्च भागवून कंपनीस १२,४४० रुपये नफा झाला, त्यांतून शेअर ब्रोकरेज सर्व काढून, एक पंचमांश प्राथमिक खर्च वजा घालून, एक विसांश गुडविल लिहून टाकून व इनकम टॅक्स आणि सुपर टॅक्सची तरतूद करून ७,३८० रुपये उरतात, त्यांतून रिडीमेबल क्यु. प्रे. भागास ५% दरानें व ऑर्डिनरी भागास ४% दरानें डिव्हिडंड देण्यांत यावें व १,२७२ रुपये पुढील वर्षाच्या हिशेबांत घ्यावे, अशी बोर्डाची शिफारस आहे. कंपनीचें भरणा झालेलें भांडवल २,३८,१२५ रुपये आहे. कंपनीनें पहिल्याच वर्षी दाखविलेलें यश उल्लेखनीय असून त्याबद्दल कंपनीचे अध्यक्ष श्री. व्ही. पी. वर्दे व मॅनेजिंग एजंट्स मेसर्स दांडेकर एंजिनिअर्स लि. हे अभिनंदनास पात्र आहेत.

भारत

दररोज
६,००० रुपयांपेक्षा अधिक
क्लेम्सचे पैसे विमेदारांस
परत केले जातात.

भारत
इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड

मुख्य कचेरी:
भारत बिल्डिंग्ज, लाहोर

१८९६ मध्ये
स्थापन
झालेली

ब्रँच ऑफिस : लक्ष्मी रोड, पुणें.

# सहकारी बँकांचे अहवाल

## दि लक्ष्मी को. बँक लि. सोलापूर

ह्या बँकेचे पटावर ५८४ सभासद आहेत;गेल्या वर्षी ५५२ होते. भरणा झालेलें भाग भांडवल २१,५५० रुपयांचें असून ६३,८८५ रुपयांच्या ठेवी आहेत. "युद्धजन्य परिस्थितीमुळें व स्थानिक परिस्थितीमुळें बँकेच्या ठेवींच्याबाबत झालेली प्रगति फारशी उठावदार दिसून येत नाहीं." बोर्डानें नवीन कर्जे मंजूर करण्याचे बाबतींत हात आखडता घेतल्यामुळें व लवादाकडे पाठविलेलीं प्रकरणें बँकेस न मिळाल्यामुळें थक बाकीचें प्रमाण ३८% आहे, असा रिपोर्टांत उल्लेख आहे. बँकेनें रिकरिंग ठेवीचें खातें उघडून नवीन उपक्रम केला आहे. दरमहा एक रुपाया अगर त्याच्या पटीइतकी रक्कम बँकेंत २४ महिनेपर्यंत भरीत राहिल्यास २४ महिन्यानंतर दरमहा भरावयाच्या रकमेइतकीच रक्कम आधिक मिळते. अहवालाचे वर्षी बँकेस १,६८१ रुपये नफा झाला,त्यांतून भागीदारांस ५% दरानें डिव्हिडंड द्यावें अशी बोर्डाची शिफारस आहे. वार्षिक सभा २२-९-४० रोजीं झाली.

## प. खा. गव्हर्मेंट सर्व्हंट्स को. बँक लि. धुळें

वरील बँकेचे पटावर १,००३ सभासद असून जमा भाग भांडवल ५४,२३९ रुपयांचें आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड १३,१५१ रुपयांचा असून इतर फंड्स १८,०७३ रुपयांचे आहेत. वर्गणी व ठेवींची रक्कम ५,४७,१०६ रुपयांची आहे. बँकेनें कर्जरोख्यांत गुंतविलेल्या रोख्यांची दर्शनी किंमत ३,३९,५०० असून गुंतविलेली रक्कम ३,६०,२२२ रुपये आहे. वर्षअखेर कर्जाची येणें बाकी १,६६,६५५ रुपये आहे. थकबाकी ७,५२० रुपये आहे. दिलेल्या कर्जाशीं थकबाकीचें प्रमाण ४·५% पडतें. फिर्यादी करून थकबाकी वसूल करण्याचे यशस्वी प्रयत्न करण्यांत आले. ज्यांचेवर फिर्यादी झाल्या नाहींत अशांची थकबाकी फक्त ८७७८-० आहे. म्हणजे एकूण कर्जाशीं त्या थकबाकीचें प्रमाण ·०५: पडतें. सेव्हिंग्ज बँक' खात्यांत १,१५,५९८ रुपये रक्कम असून गतवर्षीपेक्षां या वर्षी १३,४३० रुपयांनीं रकमेंत वाढ आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २,६३६ रुपयांचा नफा झाला. त्यांत मागील वर्षांचा ५२० रुपयांचा नफा व डिव्हिडंड इक्वलायझेशन फंडांतील ३०० रुपये मिळवून सभासदांस ५% प्रमाणें डिव्हिडंड वाटावें अशी बोर्डाची शिफारस आहे. सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्सची बँकेनें व्यवस्था केली आहे. वार्षिक सभा २९-९-४० रोजीं आहे.

## दि सोलापूर डि. को. बँक लि. सोलापूर

वरील बँकेचें भाग भांडवल १,२७,४०० रुपये असून ठेवींची रक्कम १२,४०,४१० रुपये आहे. रिझर्व्ह फंड ५२,२४३ रुपये असून इतर फंड्स ७७,२७९ रुपयांचे आहेत. बँकेनें ३,२५,००० रुपयांची बॉम्बे प्रॉ. को. बँकेकडे मुदत ठेव ठेवली आहे. तसेंच ५०,२७६ रुपये गव्हर्मेंट सिक्युरिटीजमध्यें गुंतविलेले आहेत. बँकेकडे येणें कर्ज ५,९७,७२९ रुपये आहे. बँकेच्या पंढरपूर, कुर्डूवाडी व करमाळा या शाखा ऑफिसेसमध्यें सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. मोहोळ येथें फक्त गोडाउन ऑफिस आहे. दुष्काळ व सर्वसाधारण आर्थिक मंदी यांमुळें पतपेढ्यांकडून बाकी वसुली करणें कठीण होतें. अहवालाचे सालीं पतपेढ्यांकडील कर्जाशीं थकबाकीचें प्रमाण ५४% आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ३,५६३ रुपये नफा झाला. त्यांत डिव्हिडंड इक्वलायझेशन फंडमधून १,१५१ जमा केले असतां एकूण नफा ४,७१४ रुपये होतो. त्यांतून भागीदारांस ३% दरानें डिव्हिडंड देण्यास ३,८२२ रुपयांचा विनियोग करावा अशी बोर्डानें शिफारस केली आहे. वार्षिक सभा २९-९-४० रोजीं आहे.

## अर्बन को. बँक लि. सांगली

वरील बँकेच्या ४२४ सभासदांनीं २५,१९० रुपयांचे भाग घेतले आहेत. अहवालाचें वर्षी ठेवींची रक्कम २,०५,९९० रुपयांची आहे. मागील वर्षापेक्षां ह्या वर्षी ठेवींच्या रकमेंत ५५,००० रुपयांची वाढ झाली आहे. थकबाकीची रक्कम ६,०८६ रुपयांवरून अहवालाचे वर्षी २,३७८ रुपयांवर आली. बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड्स ३,४२२ रुपयांचे आहेत. बँकेनें ७४,८४७ रुपयांचीं कर्जे कॅश क्रेडिट रूपानें दिलीं असून माल, स्थावर इ. तारणावर ८१,१७१ रुपयांचीं कर्जे दिलीं आहेत. बँकेस ४,०७० रुपयांचा नफा झाला व ६½% दरानें १,५०० रुपये डिव्हिडंड वाटावें असें ठरलें. वार्षिक सभा ३१-८-४० रोजीं झाली.

## जुन्नर अर्बन को. क्रे. सोसायटी

जुन्नर अर्बन को. क्रे. सोसायटी लि. ची चवथी वार्षिक साधारण सभा शनिवार तारीख १४ सप्टेंबर सन १९४० रोजीं भरून त्यांत सन १९४०।१९४१ सालाकरितां पुढील निवडणुकी झाल्या आहेत:—

सुपरवायझिंग कमिटी

१ श्री. व्ही. एम. जोगळेकर, चेअरमन.
२ श्री. जी. एल. जोशी, बी. ए., एलएल. बी.
३ श्री. एम. के. भगत.

व्यवस्थापक कमिटी

१ श्री. एन. ए. जोगळेकर, चेअरमन.
२ श्री. व्ही. एच. टण्णू, बी. ए. एलएल. बी. वकील.
३ श्री. एस. आर. बुट्टे.
४ श्री. व्ही. ए. बुट्टे.
५ श्री. आर. सी. सराफ.
६ श्री. के. आर. देशमुख
७ श्री. एन. बी. सोनार.

ऑनररी ऑडिटर्स

१ श्री. एन. व्ही. बापट.
२ श्री. एम. पी. पांडे.

## बँकांच्या शाखांत वाढ

शेड्यूल्ड बँकांच्या शाखांचे संख्येंत कशी वाढ होत गेली आहे, हें खालील आंकडे दर्शवितात:—

| | शेड्यूल्ड बँका | त्यांच्या हिंदुस्थानांतील व ब्रह्मदेशांतील शाखा |
|---|---|---|
| डिसें. १९३५ | ४९ | ७२३ |
| १९३६ | ५० | ८२८ |
| १९३७ | ५४ | ११३८ |
| १९३८ | ५७ | ११२५ |
| १९३९ | ६१ | १२७७ |
| मार्च १९४० | ५९ | १२९० |

## मातीची आवश्यकता नाहीं

### झाडें पाण्यांत, भुशांत अगर वाळूंत वाढतात

मातीचे सहायाशिवाय झाडें वाढवितां येतात, ही गोष्ट शास्त्रज्ञांस गेलीं ५० वर्षें माहीत आहे, परंतु प्रयोगशाळेबाहेर, मोठ्या प्रमाणावर, तशी लागवड सुरू होऊन फार वर्षें झालेलीं नाहींत. कॅलिफोर्निया येथील डॉ. गोरिक ह्यांनीं एका पिपांत माती न घालतां, टोमॅटोचीं रोपें लावलीं; त्यांचीं फळें काढण्यास शिडी लावावी लागली. डॉ. गोरिक ह्यांनीं आपल्या लागवडीचे तंत्रास हायड्रोपोनिक्स हें नांव दिलें. केमिकल्चर, अक्का कल्चर, टँक फार्मिंग, ट्रे हॉर्टिकल्चर, बाथ टब फार्मिंग, इत्यादि नांवेंहि त्यास आतां पडलीं आहेत. ह्या नवीन पद्धतीनें पिकें काढण्यास प्रारंभ केला, तर लवकरच शेतमळ्यांचें कारणच उरणार नाहीं, असें लोक म्हणूं लागले, परंतु अद्याप तशा भीतीचें कारण नाहीं. लाकडाचा भुसा व पाणी ह्यांचे आधारावर वाढणाऱ्या ८,००० झाडांपासून एका वर्षांत १२० टन टोमॅटो निघूं शकले. एका एकरांत ११६ बुशेल बटाटे निघाले तर पिपांतील बटाट्याचें उत्पादन दर एकरी २,५०६ बुशेल ह्या दरानें होतें. सर्व तऱ्हेच्या भाज्या व गुलाबाचीं झाडेंहि अशीं लावतां येतात. हायड्रोपोनिक पद्धतीमधील फायदा असा, कीं झाडें निरोगी रहातात, लवकर वाढतात, उत्पन्न चांगलें देतात, मेहनत कमी लागते, लावण्यास खर्च थोडा येतो आणि जागा लहान पुरते.

बीं, फांदी अगर रोपें पाण्यांत, वाळूंत अगर भुशांत लावावीं. त्यास दररोज शक्तिवर्धक पातळ औषधीं खतें द्यावीं. हीं तयार औषधें नर्सरींत मिळूं शकतात. एक बादलीभर पाण्यांत दोन चमचे सॉल्ट पीटर, दोन चमचे एप्सन सॉल्टस, चार चमचे बेकिंग पावडर व दोन ते आठ चमचे वॉशिंग अमोनिया ह्यांचें मिश्रण केलें असतां सर्वसाधारणपणें तें चालतें.

---

## ॲल्युमिनियम

चालू युद्धामुळें ॲल्युमिनियमचें महत्त्व एकदम वाढलें आहे. त्यास प्रचंड मागणी उत्पन्न झाली आहे, परंतु पुरवठा पुरेसा नाहीं. पुरवठा कमी आहे म्हणावें, तर जगांत लोखंडाचा, कोळशाचा अगर लाकडाचा जेवढा साठा आहे त्या प्रत्येकापेक्षा ॲल्युमिनियमचा साठा मोठा आहे. तथापि उपलब्ध ॲल्युमिनियम अतिशय थोडें आहे. सोनें जसें शुद्ध सापडतें, तसें ॲल्युमिनियम सांपडत नाहीं. इतर पदार्थांबरोबर तें मिसळलेल्या स्थितींत असतें व त्यांतून तें वेगळें काढणें अतिशय कठीण जातें. बॉक्साइटपासूनच काय तें थोड्या मोठ्या प्रमाणावर काढतां येतें. फ्रान्समधून बॉक्साइटचा पुरवठा मोठा होत असे; तो आतां उपलब्ध नाहीं. परंतु ब्रिटिश व डच गायना, हिंदुस्थान, उत्तर आयर्लंड व अमेरिका येथून तो होऊं शकतो.

ॲल्युमिनियमचा युद्धाचे कामीं उपयोग कोणता? त्याचीं विमानें करतात, हें सर्वांस माहीत आहे. कांहीं प्रकारच्या बॉंबचे बनावटीसाठींहि ॲल्युमिनियम लागतें. बाहेरून विमानांच्या रबरी कवचावर हवेचा दुष्परिणाम होऊं नये, ह्यासाठीं ॲल्युमिनियमच्या रंगाचा उपयोग केला जातो; टॉरपीडो बोटीहि ॲल्युमिनियमच्या बनवल्या जातात.

युद्धोपयोगी विमानें ड्युरेल्युमिनचीं केलेलीं असतात, त्यांत ९५% ॲल्युमिनियम असतें. परंतु ड्युरेल्युमिन ॲल्युमिनियमपेक्षा विशेष जड असलें, तरी ते अनेक पटींनीं बळकट असतें. ॲल्युमिनियमचा उपयोग हजारो प्रकारें होतो, व दिवसानुदिवस त्याचे नवे, नवे उपयोग दृष्टोत्पत्तीस येत आहेत.


सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोप्याचें कापड (Casement cloth) दारांचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

दि

बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो

बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी

लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट

पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१३,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र ऑफिस), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के., के. टी. (रजेवर), मि. ए. गोडिल, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. केराई.

करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

नियम व सेटलमेंटप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें दलालीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—डी. आर. लाळवाणी.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) | ११२—२ |
| ४% १९४३ | १०४—६ |
| ३½% विनमुदत | ९०—४ |
| ३½% १९४७–५० | १०१—१२ |
| ३% (१९६३–६५) | ९०–१० |
| २¾% १९४८–५२ | ९५–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) | १०३—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) | १०२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) | १०९—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | १२०—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% | १३३—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००–५०) १०% | १०१—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% | ३६–१२ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% | १४८२—८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक (५०) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १०१—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) ११% | १२८—८ |
| कराची (१००) ९% | १९७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | २११—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १४०२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १५८०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% | ९३—० |
| पाचोरा–जामनेर (१००) १½% | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५०.०) ११½% | ९९७—८ |
| तापी व्हॅली (५००) ८% | ७७३—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. | २००—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. | ४६—४ |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. | १८–१३ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. | ३८–१० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. | ३६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% | २०६–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. | १४२—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. | ३३२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १६८५—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. | ११६—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास | ४१-१५-० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६३—१—० |

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल–

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस
"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.
सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.
पत्ता—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर–Amritsar.




एजंट:—

महादेव गोविंद कुलकर्णी

किराणा व भुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्निमन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

For Collegians

Wooden & Iron Furniture

FOR SALE AND HIRE

Your Popular Old Shop

SHEVAK BROS.

| *Work-Shop Address:* | *Branch No. 1* |
| --- | --- |
| 153 Kasaba. | Shevak Quarters, near Fergusson College |
| Poona 2 | Poona 4 |

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द्. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.